महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मुख्य इमारत, पहिला मजला,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७ Email ID : deskkh२-rfd@mah.gov.in

---

क्र.गौखनि-४०अ/०८१४/प्र.क्र.४५०/ख-२/ई-१४९५४५६ दिनांक : २८ फेब्रुवारी, २०२६

**विषय:-** <u>गौण खनिज-जालना</u>
सन २०१३-१४ करीता मौजे भोगगांव, ता.घनसावंगी, जि. जालना या वाळूगटाच्या लिलावाची रक्कम परत करणेबाबत-.श्री. समर्थ बिल्डींग मटेरियल सप्लायर्स प्रो.प्रा.श्री. गणेश अरूणराव चव्हाण

**संदर्भ**:-१.जिल्हाधिकारी, जालना यांचे क्र.२०२५/मशाका/गौख/कावी, दि.१६.१२.२०२५ रोजीचे पत्र
२.मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्रमांक १०७७०/२०२३, दि.०१.१२.२०२५ रोजीचे आदेश

**शासन ज्ञापन :-**

जिल्हाधिकारी, जालना यांना त्यांचे पत्र क्र.२०२५/मशाका/गौख/कावी, दिनांक १६.१२.२०२५ रोजीच्या उपरोक्त विषयावरील पत्रास अनुलक्षून असे कळविण्यात येते की, सन २०१३-१४ मध्ये मौजे भोगगाव ता. घनसांगवी येथील वाळूघाट श्री. समर्थ बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स प्रो.प्रा. श्री. गणेश अरूणराव चव्हाण यांना रू. ५२,४२,२११/- एवढ्या सर्वोच्च बोलीस मंजूर करण्यात आला. लिलावधारक यांच्याकडून सदर वाळूघाटाच्या अनुषंगाने लावलेल्या सर्वोच्च बोलीची रक्कम रू. १६,२४,८४०/- दिनांक २३.०१.२०१४ व रू.२९,१७,३७१/- दिनांक २५.०१.२०१४ रोजी अशी एकूण रू.५२,४२,२११/- शासन जमा करण्यात आले.

**०२.** मंजूर वाळू स्थळातून उत्खनन करण्यास ग्रामस्थांनी प्रतिबंध केला असणे व वाळू स्थळात पाणी असल्याने अर्जदार यांना सक्शन पंपाव्दारे उत्खनन करण्यास मुदतवाढ देण्यासाठी अथवा बदली वाळूगट देणे याबाबत मा. मंत्री महसूल याच्याकडे अर्ज दाखल केला. दरम्यान लिलावधारक यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.१०३८५/२०१६ दाखल केली असता, मा. न्यायालयाने दिनांक ३०.०१.२०१७ रोजी लिलावधारक यांच्या अर्जावर १२ आठवड्यात निर्णय घेण्याचे आदेश दिले. लिलावधारक यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे अवमान याचिका क्र.५३०/२०१७ दाखल केली असता मा. न्यायालयाने सदर याचिका फेटाळली. लिलावधारक यांनी सदर अवमान याचिका Restoration करण्यासाठी सिव्हील अपील क्रमांक १२४६१/२०१८ दाखल केले असता मा. न्यायालयाने दिनांक ०४.०२.२०१९ च्या आदेशान्वये याचिकाकर्ते यांच्या अर्जावर ३ (तीन) आठवडयात निर्णय घेण्याचे आदेश दिले. मा. न्यायालयाच्या दिनांक ०४.०२.२०१९ च्या आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन मा. राज्यमंत्री (महसूल) यांनी लिलावधारक यांच्या अर्जावर सुनावणी घेवून दिनांक ०७.०८.२०१९ रोजीच्या आदेशान्वये लिलावधारक यांचा अपील अर्ज अमान्य केला.

**०३.** तदनंतर लिलावधारक यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्रमाक ७८/२०२१ मध्ये मा. न्यायालयाने दिनांक १०.०१.२०२३ रोजीच्या आदेशान्वये याचिकाकर्ते यांनी वाळूगटाच्या अनुषंगाने भरलेली रक्कम परत करण्याबाबत दाखल केलेले निवेदन/प्रस्तावर दोन आठवड्यात निर्णय घेण्याचे निर्देश दिले असता, मा. न्यायालयाने दिनांक १०.०१.२०२३ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने ता. मंत्री (महसूल) यांनी सुनावणी घेवून

दिनांक ०७.०२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये लिलावधारक यांचा फेरतपासणी अर्ज फेटाळण्यात येवून, उर्वरीत परिमाणापोटी प्रमाणशीर परतावा मिळण्याची विनंती अमान्य केली.

०४. मा. मंत्री (महसूल) यांनी दिनांक ०७.०२.२०२३ रोजी दिलेल्या आदेशाविरूद लिलावधारक यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्रमंक १०७७०/२०२३ दाखल केली असता, मा. न्यायलयाने दिनांक ०१.१२.२०२५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले :-

> **परिच्छेद क्र. ८:-** The order passed by the respondent no.१/Minister dated ०७.०२.२०२३, is hereby quashed and set aside.
>
> **परिच्छेद क्र.९:-** The Collector, Jalna is hereby directed to refund the amount deposited by the petitioner within period of four weeks from today with accrued interest thereon.

०५. मा. न्यायालयाने दिनांक ०१.१२.२०२५ रोजी दिलेले ओदश विचारात घेवून लिलावधारक श्री. समर्थ बिल्डींग मटेरियल सप्लायर्स प्रो.प्रा.श्री. गणेश अरूणराव चव्हाण यांनी सदर वाळूगटाच्या अनुषंगाने शासनास जमा केलेली सर्वोच्च बोलीची रक्कम रू. ५२,४२,२११ /-(रुपये बावन लाख बेचाळीस हजार दोनशे अकरा फक्त) इतकी लिलावधारकास परत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने लिलावधारक यांनी सदर रक्कम शासनास जमा केली याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर उत्खनन न करता आलेल्या वाळूची रू. ५२,४२,२११ /-(रुपये बावन लाख बेचाळीस हजार दोनशे अकरा फक्त) अदा करण्यास या शासन ज्ञापनाद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

०६. या बाबीवर होणारा खर्च सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता "०८५३-अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग" १०२-खनिजाबाबत सवलत फी व स्वामित्वधन,९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग-वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

०७. लिलावधारक यांनी मा. मुंबई उच्च न्यायलय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक १०७७०/२०२३ मध्ये मा. न्यायालयाने दिनांक ०१.१२.२०२५ च्या लिलावधारकाने लिलावाच्या अनुषंगाने जमा करण्यात आलेली रक्कम व त्यावरील व्याज परत करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. परंतु, मा. न्यायालयाने दिनांक ०१.१२.२०२५ रोजीच्या आदेशामध्ये किती टक्के दराने व्याज अदा करण्यात यावे याबाबत कोणतीही टिप्पणी केली नाही. मा. न्यायालयाने अन्य काही प्रकरणामध्ये सहा, आठ, बारा व पंधरा टक्के दराने व्याज परत करण्याचे आदेश दिलेले आहेत. लिलावधारकाने मा. मंत्री (महसूल) यांच्याकडे दाखल करण्यात आलेल्या अर्जामध्ये पंधरा टक्के व्याज मिळण्याची तसेच मा. न्यायालयात दाखल याचिकेमध्येही पंधरा टक्के व्याज मिळण्याची विनंती केली होती. तथापि, मा. न्यायालयाने लिलावधारकास लिलावाच्या रकमेवरील व्याज देण्याचे नमूद केले आहे. मा. न्यायालयाने व्याजाचा दर स्पष्ट केलेला नसल्याने सामान्यत: सहा टक्के व्याजाचा दर ग्राह्य धरून त्याप्रमाणे व्याजाची रक्कम लिलावधारकास परत करण्याची कार्यवाही करण्यास वित्त विभागाने सहमती दर्शवली आहे. ही बाब विचारात घेवून मौजे भोगगांव, ता. घनसावंगी, जि. जालना या वाळू घटाच्या अनुषंगाने लिलावधारक यांनी लावलेल्या सर्वोच्च बोलीच्या जमा करण्यात आलेल्या रू. १६,२४,८४०/- दिनांक २३.०१.२०१४ व रू.२९,१७,३७१/- दिनांक २५.०१.२०१४ रोजी अशी एकूण रू.५२,४२,२११/- रक्कमा विचारात घेवून, सदर रक्कमेवर त्यांनी रक्कम जमा केल्याच्या दिनांकापासूनच्या कालावधीकरीता लिलावधारक यांना द्यावयाच्या रक्कमेची ६% दराने होणाऱ्या व्याजाच्या रक्कमेचा परतावा लिलावधारकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

०८. मौजे भोगगांव, ता. घनसावंगी, जि. जालना या वाळू घटाच्या अनुषंगाने लिलावधारक यांनी लावलेल्या सर्वोच्च बोलीच्या जमा करण्यात आलेल्या रू. १६,२४,८४०/- दिनांक २३.०१.२०१४ व रू.२९,१७,३७१/- दिनांक २५.०१.२०१४ रोजी अशी एकूण रू.५२,४२,२११/- रक्कमा विचारात घेवून सदर

रक्कमेवर त्यांनी रक्कम जमा केल्याच्या दिनांकापासूनच्या कालावधीकरीता लिलावधारक यांना द्यावयाच्या रक्कमेची ६% दराने होणाऱ्या व्याजाच्या रक्कमेबाबतच्या परताव्याची परिगणना जिल्हाधिकारी, जालना यांनी करावी.

०९ सबब या बाबीवर होणारी रक्कम सन २०२५-२०२६ या चालू वर्षाकरीता "मागणी क्र.सी-१, प्रधान शिर्ष २०५३, जिल्हा प्रशासन, ०९४, इतर आस्थापना, (०१) (०६) आयुक्त, छत्रपंती संभाजीनगर (अनिवार्य), (२०५३ ०२२४) या लेखाशिर्षा अंर्तगत, १३ कार्यालयीन खर्च" या उदिष्टांतर्गत उपलब्ध असलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदीमधून संबंधित लिलावधारक यांना अदा करण्यास या शासन ज्ञापनान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**१०.** सदर शासन ज्ञापन, वित्त विभागाच्या क्र.अनौसं क्रमांक ३३/२०२६/व्यय-९, दिनांक १४.०१.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

**११.** सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०२२८१५५१०९१६१९ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SADANAND GOVIND MOHITE

Digitally signed by SADANAND GOVIND MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=9BD008875B6A3A9FDDAD3E55FE0328DF13A27221CB2BBC67ABD0155F914EFC01, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6590E2301450C474B246074049174C79201BCAD9E5EB15E8F21C282EAEFEDA38, cn=SADANAND GOVIND MOHITE
Date: 2026.02.28 15:53:35 +05'30'

**(सदानंद गो माहिते)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

**जिल्हाधिकारी, जालना**

**प्रत:-**

१) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.
३) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा), नागपूर.
४) जिल्हाधिकारी, जालना
५) जिल्हा कोषागार अधिकारी, जालना
६) कार्यासन अधिकारी (कार्यासन ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७) निवडनस्ती (कार्यासन "ख"), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.